महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

**दुरध्वनी क्र. : २६४७ ४२११ विस्तारित ३६४२ दूरभाष क्र. : ०२२-२६५८ १५१६.**
2रा माळा, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई - 400 051.
ई-मेल : promahagenco@gmail.com / aphale.mahesh@gmail.com

**संदर्भ :** मा.सं/जनसंपर्क/प्रेस नोट/५१

## पत्रकार टिप्पणी

### उरण वायु विद्युत केंद्र सुरुच राहणार
### प्रकल्पग्रस्त आंदोलकांची भूमिका गैरसमजुतीवर आधारित - महानिर्मिती

उरण येथील काही स्थानिक प्रकल्पग्रस्त तसेच स्थानिक कंत्राटी कामगार आणि अप्रेंटिस उमेदवार यांना उरण वायु विद्युत केंद्रामध्ये महानिर्मितीच्या सेवेत दाखल करुन घ्यावे, या प्रमुख मागणीसाठी काही आंदोलकांनी हे वीजकेंद्र १४ मे २०१० पासून बेमुदत बंद करण्यात येईल, असा इशारा दिल्याचे वृत्त काही स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द झाले आहे.

तथापि, यासंदर्भात महानिर्मिती कळवू इच्छिते की, प्रकल्पग्रस्त उमेदवारांना शासकीय नियमांच्या अधीन राहून महानिर्मितीच्या सेवेत सामावून घेण्यास कंपनीने नेहमीच प्राधान्य दिले आहे. नुकत्याच "कारागीर - क" पदासाठी झालेल्या भरतीमध्ये कंपनीने मोठ्या प्रमाणात प्रकल्पग्रस्तांना सेवेत सामावून घेतले आहे. येथे उल्लेखनीय बाब म्हणजे सदर भरती प्रक्रियेच्या वेळी उरण परिसरातील एकूण ९ प्रकल्पग्रस्तांपैकी ५ उमेदवार परीक्षेसाठी पात्र ठरले व त्यापैकी २ प्रकल्पग्रस्तांना नुकतेच महानिर्मितीच्या सेवेत सामावून घेण्यात आले आहे.

या पार्श्वभूमीवर उरण येथील आंदोलकांची व त्यांच्या नेत्यांची भूमिका अवाजवी असून सरळ-सरळ शासकीय नियमांचे उल्लंघन करणारी आहे. विशेषत: "बाहेरच्या कोणत्याही नियुक्त उमेदवारास आम्ही या विद्युतकेंद्रात येऊ देणार नाही", ही भूमिका पूर्णत: गैर आहे. याबाबतीत सामंजस्याने प्रबोधन करणेसाठी उरण वायु विद्युत केंद्राच्या स्थानिक व्यवस्थापनाने बोकडविरा, फुंडे, डोंगरी व पाणजे येथील सरपंच, उपसरपंच व स्थानिक विविध राजकीय पक्षांचे पुढारी यांना चर्चेसाठी वारंवार पाचारण केले होते. याप्रसंगी प्रकल्पग्रस्तांच्या भावना समजून घेण्यात आल्या व कंपनीची शासनधोरणानुसारची भूमिकादेखील सर्व संबंधितांना समजावून सांगण्यात आली. याप्रसंगी मुख्य महाव्यवस्थापक, उरण वायु विद्युत केंद्र यांनी, प्रकल्पग्रस्तांची सदर मागणी ही शासकीय धोरणात बसत नसल्याचेही सांगितले. शासकीय नियमांच्या चौकटीत अधीन राहूनच भरती प्रक्रिया राबविणे कंपनीला बंधनकारक असल्याचेही त्यांनी सांगितले. दि. १४ मे २०१० पासून हे विद्युत केंद्र बंद पाडण्याच्या भूमिकेपासून आंदोलकांनी परावृत्त व्हावे, यासाठी कळकळीचे आवाहन याप्रसंगी करण्यात आले.

चंद्रपूरच्या पाणी समस्येमुळे उद्‌भवलेली राज्यातील सध्याची भीषण वीजटंचाई, वीजग्राहकांची गैरसोय व विजेचे संकट आणखी वाढण्यास उद्‌भवू टाकणारा कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न यासंबंधीही सर्वांना अवगत करण्यात आले.

तथापि, सदर चर्चेच्या प्रसंगीदेखील आंदोलकांनी ताठर भूमिका घेऊन आम्हाला शासनाचे नियम मान्य नसून आम्ही सांगू त्याच नियमानुसार भरती करावी, असा निरर्थक हेका धरला. व्यवस्थापनाच्या विनंतीस कोणताही सकारात्मक प्रतिसाद न देता उरण केंद्र १४ मे २०१० पासून बंद करु, अशी नोटिस दिली आहे.

तथापि, महानिर्मितीतर्फे स्पष्ट करण्यात येते की, उरण वायु विद्युत केंद्रातून होणाऱ्या वीजनिर्मितीत १४ मे २०१० पासून व्यत्यय येऊ नये, यासाठी या केंद्र परिसरात चोख पोलिस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे.

---

दिनांक : ०७/०५/२०१०.

प्रति,
**माननीय संपादक,**
दैनिक

आदरणीय महोदय,

कृपया सदर बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकाच्या सर्व आवृत्तीत तातडीने प्रसिध्द करावी, ही नम्र विनंती.

धन्यवादासह,

आपला स्नेहांकित,

**जनसंपर्क अधिकारी**